# ड्रॅगन फ्रुट फळलागवडी विषयी माहिती

प्रा. विजय अविनाश माने
सहाय्यक प्राध्यापक (वनस्पतीशास्त्र विभाग)

प्रा. अभय अरविंद शिंदे
सहाय्यक प्राध्यापक (किटकशास्त्र विभाग)

साईकृपा कृषी महाविद्यालय, घारगाव

हे फळ मुळचे मेक्सिकोचे असल्याचे मानले जाते. तेथून ते मध्य अमेरिका व जगभरातील अन्य देशांमध्ये प्रसारित झाले. हे पिक जगभरातील उष्णप्रदेशीय देशांमध्ये घेतले जाते. याचे वेल छत्रीसारखे दिसते, या वेलींच्या वाढीसाठी आधाराची गरज असते.



## ड्रॅगन फ्रुट पिकाची ठळक वैशिष्ट्ये:

- किमान पाणी देणे आवश्यक आहे
- कमी कालावधीचे पिक
- भारतीय हवामान पोषक
- आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी

## उपयोग:

ड्रॅगन फ्रुट हे औषधी गुणधर्म असणारे फळ आहे. मधुमेह नियंत्रित करण्यासाठी त्याचबरोबर शरीरातील हानीकारक कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी मदत होते. संधिवात रोखण्यासाठी या फळाची मदत होते. तसेच या फळांमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने भरपूर प्रमाणात उपलब्ध असतात.

ड्रॅगन फळांमध्ये व्हिटॅमिन सी आणि इतर अँटीऑक्सिडेंट्स जास्त असतात, जे आपल्या रोगप्रतिकारक शक्तीसाठी चांगले आहेत. हे आपल्या लोह पातळीला चालना देऊ शकते. आपल्या शरीरात ऑक्सिजन पुरवठासाठी आणि आपल्याला ऊर्जा देण्यासाठी लोह महत्त्वपूर्ण आहे आणि ड्रॅगन फळामध्ये लोह आहे आणि ड्रॅगन फळातील व्हिटॅमिन सी आपल्या शरीरास लोह घेण्यास आणि वापरण्यास मदत करते.

ड्रॅगन फळांमध्ये कॅलरी: १०२, चरबी: ० ग्रॅम, प्रथिने: २ ग्रॅम, कर्बोदके: २२ ग्रॅम, फायबर: ५ ग्रॅम, साखर: १३ ग्रॅम, व्हिटॅमिन सी: ३ %, लोह: ४ %, मॅग्नेशियम: १० % हे घटक असतात.

## फळाचे प्रकार:

या फळ पिकांमध्ये आपल्याला तीन प्रकार दिसून येतात. पहिला प्रकार लाल रंगाचे फळ आणि पांढरा गर, दुसरा प्रकार लाल रंगाचे फळ आणि लाल गर, तिसरा प्रकार पिवळ्या रंगाचा फळ आणि पांढरा गर.

## जमिन:

हे पीक वेगवेगळ्या जमिन प्रकारामध्ये घेतले जाते. त्याचा सामू ५.५ ते ७.५ इतका असावा, तसेच जमिन योग्य निचऱ्याची असावी, जमिनीची पूर्वमशागत करताना नांगरणी कुळवणी करून जमिन स्वच्छ करावी.

## लागवड पद्धत:

फळ पिकाची लागवड कटिंग करून रोपे तयार केली जातात आणि त्या रोपांची लागवड केली जाते. ही रोपे निवडताना रोग व कीड मुक्त असावे.

## लागवडीचे अंतर:

दोन झाडातील व ओळीतील अंतर २x२ मीटर असावे. लागवडीसाठी ६०x६०x६० सेंटिमीटर आकाराचा खड्डा घेऊन माती, शेणखत व १०० ग्रॅम फॉस्फेट प्रति खड्डा भरून घ्यावे. एक एकरमध्ये सताराशे रोपे बसतात. वेलीच्या आधारासाठी पाच फूट उंच सेंटीमीटरचे सिमेंट पोल रोवून त्याला टायर बांधून वेलाचे व्यवस्थापन करावे.

## पाणी व्यवस्थापन:

हे झाड काटेरी वर्गातील असल्यामुळे यास पाणी कमी लागते. आवश्यक भासल्यास पाणी द्यावे. सिंचन प्रणालीचा वापर करावा. लागवड करताना, फुले लागताना, फळांची वाढ होताना त्याचबरोबर उष्ण वातावरणात झाडाला जास्त पाण्याची गरज लागते.

## फळांची काढणी:

फळ पिकामध्ये पहिल्या वर्षी पासून फळाची धारणा होते. या पिकांमध्ये मे-जून महिन्यामध्ये फुले लागण्यास सुरुवात होते. त्यानंतर एक महिन्यात फळ काढण्यासाठी तयार होते. या पिकामध्ये फळ काढणीसाठी आले हे ओळखण्यासाठी फळ अर्ध पक्व अवस्थेमध्ये गडद हिरव्या रंगाचे असते आणि काढण्यासाठी योग्य झाले त्यावेळेस त्याचा रंग लाल होतो. तीन ते चार दिवसानंतर रंग बदलल्यानंतर फळाची काढणी करावी.

## उत्पादन:

सर्वसाधारण या फळाचे उत्पादन पाच ते सहा टन प्रती एकर होते.

(संपर्क: +९१ ८३०८४०४७५१)

★ ★ ★